नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

बीड कृषि हवामान सल्ला **शुक्रवार दिनांक – ०४.१०.२०१९**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०५ ते ०९ ऑक्टोबर, २०१९)				
दिनांक	०५/१०	०६/१०	०७/१०	०८/१०	०९/१०
पाऊस (मिमी)	१२.०	१४.०	१६.०	१५.०	१५.०
कमाल तापमान (अं.से.)	३२.०	३३.०	३३.०	३३.०	३४.०
किमान तापमान (अं.से.)	२१.०	२१.०	२२.०	२१.०	२१.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८५	८४	८२	८५	८७
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६२	५५	५०	५२	५४
वा-याचा वेग (किमी / तास)	०६	०४	०६	०८	०९
वा-याची दिशा	पश्चिम	आग्नेय	ईशान्य	ईशान्य	पूर्व

हवामानाचा इशारा	सध्यस्थितीत जिल्हयात पुढील पाच दिवसात हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सोयाबीन	काढणी अवस्था	पावसाचा अंदाज लक्षात घेऊन वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या सोयाबीन पिकाची कापणी करावी. कापणी केलेले सोयाबीन पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.
खरीप ज्वारी	दाणे भरणे अवस्था	खरीप ज्वारी पिकात कणासावरील अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
बाजरी	दाणे भरणे अवस्था	बाजरी पिकात कणासावरील अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
ऊस	वाढीची अवस्था	ऊस पिकात खोड किडीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच हुमणी अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मेटाराईझीयम ॲनासोप्ली या जैविक बुरशीचा ४ किलो प्रती एकर जमिनीतुन वापर करावा. पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
हळद	कंद वाढीची अवस्था	हळद पिकावरील कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी उघडे पडलेले कंद झाकून घ्यावेत व क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५०० मिली प्रती एकर याप्रमाणात आळवणी करावी. हळद पिकात पानावरील ठीपके या रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी पावसाने उघाड दिल्यास मॅन्कोझेब २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
हरभरा	वाणांची निवड	हरभरा पिकाच्या पेरणीसाठी विजय, विशाल, आकाश, विकास (फुले जी-१२), बीडीएन-९-३, बीडीएनजी-७९७ यापैकी एका वाणाची निवड करावी.

करडई	वाणांची निवड	करडई पिकाच्या पेरणीसाठी अन्नेगिरी-१, भिमा, शारदा, परभणी-१२, परभणी-४० (बिन काटेरी), ऐकेएस-३२७, एसएसएफ-६५८, नारी-६ या सारख्या अधिक उत्पादन देणा-या वाणांची निवड करावी.
संत्रा /मोसंबी	फळधारणा अवस्था	संत्रा / मोसंबी फळबागेत रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी रोगनाशकाची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. बागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
डाळिंब	फळधारणा अवस्था	डाळिंब फळबागेत रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी उपाययोजना कराव्यात. बागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
फुल शेती	काढणी / वाढीची अवस्था	नवरात्रोत्सव व दसरा सणामुळे बाजारपेठेत फुलांना अधिक मागणी असते, बाजारपेठ व फुलांची मागणी लक्षात घेऊन फुलांची काढणी टप्याटप्याने करावी. फुलपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
भाजीपाला	काढणी / वाढीची अवस्था	भेंडी व वांगी भाजीपाला पिकावरील रसशोषन करणा-या किडींच्या व्यवस्थापनासाठी फेन्प्रोपेथ्रीन ३० टक्के ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाणे उघाड दिल्यास फवारणी करावी. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करून प्रतवारी करावी व बाजारपेठेत पाठवावी. भाजीपाला पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
चारा पिके	वाणांची निवड	रब्बी हंगामात ज्वारी या चारा पिकाच्या लागवडीसाठी रूचीरा आर-४-११, मालदांडी-३५-१, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, आय एस ४७७६, एएसजी –१४ किंवा एमकेव्ही चारी या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी.
तुती रेशीम उदयोग	--	चौथी कात अवस्थेतुन रेशीम किटक बाहेर पडल्यानंतर सात दिवस तुती फांदया खादय दयावे. आर्द्रता ८५ ते ९० टक्के पेक्षा जास्त असेल तर खादय देण्यापूर्वी पांढरा चुना पावडरची (रसायनमुक्त) धुरळणी करावी. १०० अंडीपूंज्यास १५ ते २० किलो चुना पावडर लागते. शेतात तुती पाने / फांदया उपलबधतेनुसारच अंडीपुंज्याचे नियोजन करावे. किटक कोषावर आल्यानंतर फांदया खादय कमी करावे. जास्त खादय दिल्यास पानात लपून रेशीम किटक कोष करतात, नंतर चंद्रीका टाकाव्यात. चंद्रीकेवर ५० किटक प्रती चौ. फुट याप्रमाणे असावे.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.